# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय, शीव, मुंबई-22

क्र. लोटिरू./2389/अधिष्ठाता. दिनांक:- 03.05.2021

## सूचना परिपत्रक

....................

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय शीव, मुंबई-२२ येथे सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांची एकूण ०६ पदे, कंत्राटी तत्वावर एकावेळी ०३ महिन्यापेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीकरिता प्रत्येक ०३ महिन्यानंतर ०१ दिवस सेवाखंड देऊन पुर्ननेमणुक अशा स्वरुपात विहित अर्हताधारक उमेदवाराकडून वॉक-इन- सिलेक्शन पध्दतीने भरण्यांत येणार आहेत.

सदर उमेदवारांनी अर्जासह अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई 400 022, यांच्या दालनात दिनांक ११.०५.२०२१ रोजी सकाळी 11.00 वाजता प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (walk-in-interview) उपस्थित रहावे. उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती मुलाखतीच्यावेळी घेऊन यावीत.

**पदाचा तपशील:-**

| पदाचे नांव | वेतनश्रेणी | भरावयाची पदे |
|---|---|---|
| सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | ठोक वेतन दर महा. रु. ७८,०००/- | ०६ |

**शैक्षणिक अर्हता:-**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.

२) उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (Maharashtra Medical Council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.

३) उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्याचे दोन सत्र आवासी अधिका-यांचे पद (House Post) किंवा एक वर्षाचे सलग निवासी वैद्यकीय अधिका-यांचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.

४) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत १०० गुणाचा मराठी विषय (निम्न स्तर किंवा उच्च स्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.

५) एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असावा.

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण, इ. च्या प्रमाणित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**वयाची अटः-** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदर नसल्यास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा ४३ वर्ष जास्त नसावा.

**अर्जाचे शुल्कः-** खुल्या उमेदवारासाठी रु. ३००/- + ५% GST = रु.३१५/-
मागासवर्गीय उमेदवारासाठी रु. २००/- + ५% GST = रु.२१०/-

**अर्ज स्विकारण्याबाबतः-** उमेदवाराने त्याचे अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयातील रोख विभागाकडून घेण्यात यावेत. अर्ज दि.०४.०५.२०२१ पासून दि.०८.०५.२०२१ पर्यत लो.टि.म.स. रुग्णालयाच्या वरिष्ठ आस्थापना विभागात सकाळी ११ ते ४ वाजे पर्यत स्विकारले जातील.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्त्वावर असल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 व मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाही.

4|5|2021

**डॉ.(श्री.) मोहन जोशी**
**अधिष्ठाता,**
**लो.टि.म.स.रुग्णालय, शीव,मुंबई-22**

DEAN
Lokmanya Tilak Municipal General
Hospital & Medical College,
Sion, Mumbai - 400 022